श्री शिवाजी विद्यालय, निंबा येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा >>पान 2

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या संकल्पनेतून साजरा झाला सामाजिक भान जपणारा गणेशोत्सव >>पान 3

अनंत चतुर्दशीच्या विसर्जन मिरवणुकीत वंदे मातरम मंडळाचा 'लंका दहन' देखावा विशेष आकर्षण >>पान 4


**सुविचार**
आपले विचार शुद्ध ठेवा.


दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 46 ■ रविवार, दि. 07 सप्टेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




भर पावसात प्रिया वॉरियरचा तुफान डान्स, मनमोहक अदांनी नेटकऱ्यांची मने जिंकली

आतील पान

## शिवाजी पार्कातील विसर्जनात परदेशी पाहुण्यांची धम्माल, पाणीपुरी आणि बँजोवर झाले फिदा

**मुंबई/प्रतिनिधी:** गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या या जयघोषात शनिवारी लाडक्या बाप्पाला निरोप दिला. संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या गणपती बाप्पाची दहा दिवस भक्तीभावाने पूजा केल्यानंतर सर्वत्र भावूक मनानं बाप्पाला निरोप देण्यात आला. मध्य मुंबईतील सर्वात प्रसिद्ध आणि महत्त्वाचं विसर्जन स्थळ म्हणून दादर चौपाटी आणि शिवाजी पार्क परिसराची ओळख आहे. मुंबईतील सर्वात मोठा सण म्हणजे गणेशोत्सव आणि या उत्सवातील सर्वात महत्त्वाचा दिवस म्हणजे विसर्जनाचा दहावा दिवस. या दिवशी जवळपास अख्खी मुंबई रस्त्यांवर उतरते. ती नाचते, गाते, गुलाल उधळते, आज हे शहर खऱ्या अर्थानं जिवाची मुंबई काय असते त्याचा अनुभव घेते. हा अनुभव संपूर्ण जगात प्रसिद्ध आहे, त्यामुळे याचं अप्रूप असलेले अनेक पर्यटक आपले दौरे त्यानुसार जुळवून घेतात. शिवाजी पार्कवर ई टीव्ही भारतनं अश्याच काही परदेशी पाहुण्यांना गाठलं. अमेरिक, इटली, स्लोव्हाकिया अश्या विविध देशांतून आलेल्या मित्रांच्या या ग्रुपनं विसर्जनाची पूर्ण मजा घेतली.

# वर्षा निवासस्थानी गणपती बाप्पाचे पर्यावरणपूरक विसर्जन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमृता फडणवीस यांनी केले गणरायाचे विसर्जन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** मुख्यमंत्री निवास 'वर्षा' येथे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या उपस्थितीत लाडक्या गणपती बाप्पाचे विसर्जन भावपूर्ण वातावरणात पार पडले. कुटुंबियांसह गणेशभक्तांच्या उपस्थितीत हे विसर्जन पारंपरिक तसेच पर्यावरणपूरक पद्धतीने करण्यात आले. बाप्पाला निरोप देताना वातावरण भक्तिभावाने भारावले होते.

गेल्या दहा दिवसांपासून 'वर्षा' निवासस्थानी गणेशोत्सव अत्यंत श्रद्धा, भक्ती आणि आनंदात साजरा करण्यात आला. दररोज पूजन, आरती, सांस्कृतिक कार्यक्रम आणि भक्तांशी संवाद अशा उपक्रमांमधून बाप्पाची सेवा करण्यात आली. या काळात निवासस्थानी आलेल्या पाहुण्यांसाठी योग्य व्यवस्थाही करण्यात आली होती.





विसर्जन प्रसंगी ''निरोप घेतो देवा, आम्हा आज्ञा असावी; चुकले आमुचे काही, त्याची क्षमा असावी...'' अशा भावस्पर्शी ओव्यांमध्ये आणि ''गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!'' या जल्लोषात बाप्पाला निरोप देण्यात आला. पर्यावरणाची काळजी घेत, घरच्या घरीच तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावात विसर्जनाची प्रक्रिया पार पडली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमृता फडणवीस यांनी बाप्पाच्या चरणी नतमस्तक होत सर्व जनतेसाठी सुख, समृद्धी आणि शांततेची प्रार्थना केली. तसेच, पुढील वर्षी आणखी अधिक भक्तिभावाने आणि उत्साहाने गणरायाचे स्वागत करण्याचा संकल्पही व्यक्त केला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही 'वर्षा' निवासस्थानी गणेशोत्सव पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड देत साजरा करण्यात आला. यामध्ये पर्यावरणपूरक सजावट, प्लास्टिकमुक्त उपक्रम, स्वच्छतेवर भर आणि जलसंधारणाबाबत जनजागृती करण्यात आली.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पुढाकाराने गणेशोत्सवाच्या निमित्ताने समाजहिताचे संदेश देणाऱ्या उपक्रमांना चालना मिळत असल्याचे चित्र यावेळी दिसून आले. गणपती बाप्पा मोरया! पुढच्या वर्षी लवकर या!

# डॉ. नीलम गोऱ्हे यांचा कसबा गणपतीला हार अर्पण : पुण्याच्या विसर्जन मिरवणुकीत भावनिक सहभाग





दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे

**पुणे:** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यंदाच्या पारंपरिक गणेश विसर्जन मिरवणुकीत अत्यंत भावनिक आणि भक्तिभावपूर्ण सहभाग नोंदवला. पुण्याच्या मानाच्या गणपतींपैकी पहिल्या मानाचा श्री कसबा गणपती आणि दुसऱ्या मानाच्या श्री तांबडी जोगेश्वरी गणपतीचे दर्शन घेत त्यांनी प्रसाद अर्पण केला आणि सार्वजनिक जीवनात आपल्या सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळत धार्मिक परंपरांनाही तितकेच महत्त्व दिले.

विशेष म्हणजे, पुणे उपविभागीय अधिकारी श्री. विठ्ठल जोशी यांच्या विनंतीनुसार डॉ. गोऱ्हे यांच्या हस्ते प्रशासनाच्या वतीने श्री कसबा गणपतीला पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी त्यांनी गणरायाचे दर्शन घेतले आणि पुणेकरांसाठी सुख, समृद्धी व शांतीची प्रार्थना केली.

**भावनिक भावना आणि सामाजिक संदेश**

यावेळी माध्यमांशी संवाद साधताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, ''मानाच्या गणपतींच्या विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणे ही माझ्यासाठी भावनिक बाब आहे. कसबा गणपती व तांबडी जोगेश्वरीच्या कृपेने पुणेकरांच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि शांती नांदो, अशी माझी प्रार्थना आहे. हा उत्सव केवळ भक्तिभावाचा नाही, तर सामाजिक ऐक्य, परंपरेची जपणूक आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन देणारा आहे.''

तसेच, त्यांनी पुणेकरांना सुरक्षिततेचे भान ठेवून आनंदाने आणि भक्तिभावाने विसर्जन मिरवणुकीचा समारोप करण्याचे आवाहनही केले.

**उपस्थित मान्यवर आणि गौरव सोहळा**

या सोहळ्यात अनेक मान्यवर व्यक्ती उपस्थित होते. त्यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, शिवसेनेचे आणि युवासेनेचे स्थानिक पदाधिकारी यांचा समावेश होता. याशिवाय, महापालिका, पोलीस व महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे यांच्या समाजकार्यातील योगदानाची दखल घेत, कसबा गणपती मंडळ व तांबडी जोगेश्वरी मंदिर गणेश मंडळ यांच्या वतीने त्यांचा श्रीफळ, शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या महिला सबलीकरण, सामाजिक समतेसाठीच्या कार्याचे आणि सांस्कृतिक योगदानाचे विशेष कौतुक केले.

**उत्सवात एकतेचा आणि संस्कृतीचा संगम**

पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात आणि आकर्षक देखाव्यांच्या पार्श्वभूमीवर निघालेल्या या मिरवणुकीत, डॉ. गोऱ्हे यांचा सहभाग ही एक सामाजिक ऐक्य आणि संस्कृतीच्या जतनाचा प्रतीकात्मक घटना ठरली. उत्सवाच्या निमित्ताने राजकीय, सामाजिक आणि धार्मिक स्तरावरील अनेक घटक एकत्र आले होते.

## टेकडीवरील मंदिरात जाण्यासाठी वापरातली रोपवे ट्रॉली कोसळली; सहा जणांचा मृत्यू



पंचमहल (गुजरात) : देशभरात गणेश विसर्जनाचा उत्साह आहे. आपल्या लाडक्या बाप्पाला गणेश भक्त निरोप देत आहेत. दुसरीकडं गुजरातमध्ये रोपवे दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झालाय. गुजरातमधील पंचमहल जिल्ह्यातील पावगड टेकडीवरील तीर्थक्षेत्र स्थळी शनिवारी दुपारी एक मालवाहू रोपवे ट्रॉली कोसळून सहा जणांचा मृत्यू झालाय. मागील वर्ष अशीच एक रोपवे दुर्घटना गुजरातमध्ये घडली होती. त्यातही अनेक जणांचा मृत्यू झाला होता.

बांधकाम साहित्य टेकडीवर वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणारी मालवाहू रोपवे ट्रॉली केबल तुटल्याने खाली पडली. मालवाहू रोपवेचा वापर प्रामुख्याने मंदिर ट्रस्ट, कर्मचारी आणि विशेष पाहुणे करत होते. तांत्रिक बिघाडामुळे टॉवर कोसळला तेव्हा काही कर्मचारी रोपवेमध्ये होते, असे वृत्त आहे. सुरुवातीच्या वृत्तानुसार, या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी सांगितले की, मृतांमध्ये ऑपरेटर आणि इतर कर्मचाऱयांचा समावेश आहे.

मृतदेह हलोल उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. हलोल शहरात गणेश विसर्जन मिरवणूक सुरू असताना ही घटना घडली. पावगड हे एक लोकप्रिय तीर्थक्षेत्र आहे आणि गुजरातमधील भाविक येथे भेट देतात. हे मंदिर सुमारे ८०० मीटर उंचीवर आहे, यात्रेकरू शिखरावर पोहोचण्यासाठी सुमारे दोन हजार पायऱ्या चढतात. खराब हवामानामुळे हा रोपवे सर्वसामान्यांना वापरण्यासाठी सकाळपासून बंद करण्यात आला होता, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## मुसळधार पावसात नाशिकमध्ये लाडक्या बाप्पाला निरोप

**नाशिक/प्रतिनिधी:** नाशिकमध्ये सकाळपासून पावसाची संततधार सुरू आहे. अशात जुने नाशिक भागातील वाकडी बारव इथून पारंपरिक सार्वजनिक विसर्जन मिरवणूक सुरू आहे. शहरात सुरू असलेल्या मुसधार पावसात ढोल पथक वादन सादर करत उत्साहाच्या वातावरणात आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देत आहेत. यंदा पारंपरिक गणेश विसर्जन मिरवणुकीत पंचवीस मोठ्या सार्वजनिक मंडळांचा सहभाग आहे.

गोदावरी नदीला पूर : नाशिकमध्ये मागील तीन दिवसापासून पावसाची संततधार सुरू आहे. तसंच गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस होत असल्यानं गंगापूर धरणातून दोन हजार क्यूसेक वेगानं गोदावरी नदीत पाण्याचा विसर्ग केला जातोय. त्यामुळं गोदावरी नदीला पूर आला आहे. पंचवटी रामकुंड परिसरातील लहान, मोठी मंदिरं पाण्याखाली गेली आहेत. भाविकांनी धोका पत्करून नदीमध्ये उतरू नये, अशा सूचना जिल्हा प्रशासनाच्या वतीनं देण्यात आल्या आहेत.

# ओबीसी समाजावर अन्याय आंदोलनाची तयारी; नागपुरात मोठा मोर्चा काढण्याचा निर्णय : वडेट्टीवार

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी:** ओबीसी समाजाच्या आरक्षण आणि हक्कांच्या मुद्द्यावरून राज्यात पुन्हा एकदा असंतोष उफाळून आला आहे. विदर्भातील ओबीसी चळवळीतील नेते, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नागपूर येथे आज पार पडलेल्या बैठकीत, ओबीसी समाजावर होणाऱ्या अन्यायाच्या पार्श्वभूमीवर न्यायालयीन आणि रस्त्यावरील आंदोलन छेडण्याचा निर्णय घेण्यात आला. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी ही माहिती दिली.

वडेट्टीवार म्हणाले, ''पूर्वी सरकारने काढलेल्या पहिल्या शासन निर्णयामध्ये 'पात्र' हा शब्द स्पष्टपणे नमूद होता. मात्र नंतरच्या दुसऱ्या जीआरमध्ये तो शब्द वगळण्यात आला. हा बदल म्हणजे ओबीसी समाजावर अन्याय असून, यामुळे समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.''

या पार्श्वभूमीवर १२ सप्टेंबर रोजी एक समिती स्थापन करण्यात येणार असून, पुढील आंदोलनाची दिशा आणि न्यायालयीन लढ्याचे स्वरूप ठरवण्यात येणार आहे. वडेट्टीवार यांनी यावेळी सांगितले की, ''आमची न्यायालयीन आणि रस्त्यावरील आंदोलनाची पूर्ण तयारी आहे. नागपुरात मोठा मोर्चा काढण्याचा निर्णय आजच्या बैठकीत झाला.''

या बैठकीत वकिलांच्या संघटनाही सहभागी होत्या. ''विदर्भातील वकील संघटना देखील न्यायालयात याबाबत लढा देण्यास तयार आहेत. जे कोणी न्यायालयात याबाबत जातील, त्यांच्यासोबत आम्ही सविस्तर चर्चा करू आणि त्यांना आमचा पाठिंबा असेल,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.



वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका करत म्हणाले, ''ज्यांना ओबीसी समाजाचे नुकसान होत नाही असे वाटत असेल, तो त्यांचा वैयक्तिक निर्णय असू शकतो. मात्र आम्हाला हे नुकसान स्पष्टपणे दिसत आहे. कोणीही सत्ताधाऱ्यांच्या मागलिकत्वाचा स्वीकार करत असेल, तर जनता त्याचे 'समाचार' निश्चित घेईल.''

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यात सध्या राजकीय वातावरण तापले असून, पुढील काही दिवसांत आंदोलनाच्या नव्या लाटेची शक्यता आहे. याबाबत राज्य सरकारने त्वरित भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**''आमची न्यायालयीन आणि रस्त्यावरची आंदोलनाची तयारी आहे. नागपुरात मोठा मोर्चा निघेल. ओबीसी समाजावर अन्याय सहन केला जाणार नाही.''**
**विजय वडेट्टीवार, काँग्रेस नेते**

## आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक

१८५७ साली झालेला उठाव हा भारतीय इतिहासातील इंग्रजांविरोधात झालेला पहिला उठाव आहे असे मानले जाते मात्र त्या अगोदरही इंग्रजांना भारतातून हाकलून देण्यासाठी अनेक छोटेमोठे उठाव झाले मात्र त्यातील काही उठावांची नोंद इतिहासात घेण्यात आली तर काही उठावांची नोंदच झाली नाही. अशाच एका उठावाचे जनक ज्यांनी इंग्रजांना सलग १४ वर्ष पळता भुई केली त्या आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांची ७ सप्टेंबर रोजी जयंती. ७ सप्टेंबर रोजी आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक यांची जयंती असूनही त्यांची जयंती साजरी करावी असे खूप कमी लोकांना वाटले कारण ते ज्या समाजात जन्मले तो रामोशी बेडर समाज आजही उपेक्षितच आहे त्यामुळे इतका मोठा क्रांतिकारक भारताच्या इतिहासात होऊन गेला हे आजही अनेकांना माहीत नाही. आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिवडी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचे नाव दादोजी खोमणे होते. त्यांचे कुटुंबीय पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत असे म्हणून त्यांना नाईक ही पदवी मिळाली पुढे ते नाईक याच नावानेच ओळखले जाऊ लागले. लहानपणापासून काटक, चंचल आणि शूर असणारे निधड्या छातीचे उमाजी नाईक यांना गुलामगिरीची चीड होते. १८३० साली इंग्रजांनी पुण्यात दुसऱ्या बाजीरावास स्थानापन्न केले तेंव्हा त्याने पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी रामोशी बेडर समाजाकडून काढून घेतली आणि स्वतःच्या मर्जीतील लोकांना ती जबाबदारी दिली त्यामुळे साहजिकच रामोशी समाज खवळला त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली जबाबदारी अशी अचानक काढून घेतल्याने उमाजी नाईक कमालीचे संतप्त झाले शिवरायांपासूनच स्फूर्ती घेऊन त्यांनी आपल्या काही साथीदारांसह इंग्रजांना भारतातून हाकलून देण्याची शपथ घेतली. उमाजी नाईक समाजातील गोरगरिबांना आर्थिक मदत करत त्यासाठी ते इंग्रज, सावकार आणि मोठ्या वतनदारांना लुटत. जर कोणी माता भगिनींवर अन्याय करत असत तर ते भावाप्रमाणे धावून जात असत. या दरम्यान त्यांना एकदा अटक झाली त्यांना एका वर्षाची शिक्षा झाली. या एका वर्षात ते तुरुंगातच लिहायला शिकले. एका वर्षाची शिक्षा भोगून आल्यावर त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानून त्यांनी इंग्रजांविरुद्ध लपून छपून लढाया केल्या. उमाजी नाईक यांच्या या गनिमीकाव्याने इंग्रज मेटाकुटीला आले. इंग्रज अधिकारी उमजींना पकडण्यासाठी जंग जंग पछाडत होते मात्र उमाजी त्यांच्या हातावर तुरी देत होते. एकदा इंग्रज आणि उमाजींचे सैन्य समोरासमोर आले तेंव्हा उमाजींच्या सैन्याने इंग्रजांच्या सैन्याचा पराभव केला. या लढाईत उमाजींनी पाच इंग्रजांची मुंडकी उडवली त्यामुळे इंग्रज अधिकच भयभीत झाले. त्यांच्या मनात उमाजींची भीती बसली. १८२४ ला उमाजींनी भाबुर्डी येथील इंग्रजांचा खजिना लुटून देवळाच्या देखभालीसाठी लोकांना वाटला. २१ डिसेंबर १८३० ला उमाजींनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्याला मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवून पळवून लावले. त्यांच्या या बंडाला जनतेतूनही मोठा प्रतिसाद मिळत होता. उमाजी नाईक यांनी इंग्रजांविरुद्ध एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता त्यात त्यांनी नमूद केले होते की लोकांनी इंग्रजांच्या नोकऱ्या सोडाव्यात. इंग्रजांविरुद्ध सर्वांनी एकत्र यावे. इंग्रज सरकार विरोधात अराजकता माजवावी. इंग्रजांचा खजिना लुटून तो गोरगरिबांना वाटावा. इंग्रजांशी असहकार पुकारवा. त्यांना शेतसारा, पट्टी देऊ नये. त्यांच्या या जाहिरनाम्याचे पालन सर्वसामान्य जनता करू लागल्याने इंग्रज आणखी बिथरले. त्यांनी उमाजींना पकडण्यासाठी आता फोडा आणि झोडा नीती अवलंबली. उमाजींची माहिती देणाऱ्यास १० हजार रुपये आणि चारशे बिघा जमीन मिळेल असे बक्षिस ठेवले. इंग्रजांची ही नीती कामी आली. एका महिलेचे अपहरण केले म्हणून काळोजी नाईक याचे हात उमाजींनी कलम केले होते तो इंग्रजांना जाऊन मिळाला. उमाजींच्या जवळचा नाना चव्हाण हा देखील इंग्रजांना जाऊन मिळाला. या दोघांनी फितुरी करून उमाजींची माहिती इंग्रजांना दिली. १५ डिसेंबर १८३१ रोजी भोर तालुक्यातील उतरेली गावात उमाजींना पकडण्यात आले. उमाजींवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला. ३ फेब्रुवारी १८३२ ला उमाजींना फाशी देण्यात आली. देशासाठी फासावर जाणारा उमाजी हा पहिला क्रांतिकारक ठरला. फासावर चढण्यापूर्वी उमाजींचे शेवटचे शब्द होते शिवाजी महाराज की जय! वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी देशासाठी हसत हसत फासावर चढणारा हा क्रांतिकारक भारताच्या इतिहासातील पहिला क्रांतिकारक ठरला म्हणून त्यांना आद्यक्रांतिकारक असे म्हणतात. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन पुढे अनेक क्रांतिकारक देशात निर्माण झाले मात्र दुर्दैवाने या महान क्रांतिकारकाने केलेली क्रांती आजही खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच त्यांच्या जयंतीदिनी सर्वांनी त्यांच्या कार्याची ओळख नवीन पिढीला करुन द्यावी. आद्यक्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# श्री शिवाजी विद्यालय, निंबा येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा

## आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण; गुणवंत विद्यार्थी व क्रीडाशिक्षकांचा सन्मान

दैनिक आपला विदर्भ

■ लुकमान शहा

**निंबा** : दि. ०६ सप्टेंबर २०२५ रोजी श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय निंबा येथे, स्व. तुळशीरामजी भगवानजी खोट्टे यांच्या स्मृतिपित्यर्थ, ''आदर्श शिक्षक पुरस्कार समिती निंबा'' यांच्या वतीने शिक्षक दिन मोठ्या उत्साहात व सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य मा. श्री. धांडे सर यांनी भूषवले, तर प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री रामदासजी खोट्टे सर उपस्थित होते. याशिवाय प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस पाटील प्रमोद देशमुख, सरपंच सौ. ज्योतीताई सोनोने, ग्रा.पं. सदस्य सत्यभामा गव्हाळे, गणेश बाप्पू देशमुख, तंटामुक्ती अध्यक्ष शेख राजू, श्री. अनिकेत तायडे, सोसायटी संचालक पुष्पाताई चोपडे, सरपंच पती पुरुषोत्तम सोनोने, शेख वसीम आदी मान्यवर उपस्थित होते.






**कार्यक्रमाची सुरुवात आणि स्वागतपर सत्र**

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख, स्व. श्रीधरराव बाप्पू देशमुख उपाख्य मालक व स्व. तुळशीरामजी भगवानजी खोट्टे यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली.

त्यानंतर उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांचे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला.

**विद्यार्थ्यांचा सन्मान व क्रीडाशिक्षकांचा गौरव**

राज्यस्तरीय रग्बी स्पर्धांमध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला. यासोबतच क्रीडा शिक्षक श्री. उगले सर आणि श्री. खचकड सर यांचाही गौरव करण्यात आला.

**आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण**

स्व. तुळशीरामजी खोट्टे यांच्या स्मृतीपित्यर्थ खालील तीन शिक्षकांना ''आदर्श शिक्षक पुरस्कार'' प्रदान करण्यात आला:

नागेश बाबूलाल सोळंके जि.प. शाळा, निंबा

अनिल साहेबराव बढे श्री शिवाजी विद्यालय, निंबा

प्रमोद श्रीराम तरटे श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, निंबा

पुरस्कार स्विकारल्यानंतर तीन्ही शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करत समितीचे आभार मानले व पुढील कार्यासाठी प्रेरणा दिली. मान्यवरांचे मनोगत आणि कार्यक्रमाची सांगता

या प्रसंगी मा. रामदासजी खोट्टे व मा. बाबारावजी वानखडे (दगडखेड) यांनी उपस्थितांना मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य धांडे सर यांनी शिक्षकांचे समाजातील महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाला गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षकवर्ग, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन कु. बाळसराफ मॅडम यांनी तर आभारप्रदर्शन श्री. सचिन खोट्टे (ग्रा. पं. सदस्य) यांनी केले.

# भर पावसात बुलढाण्यात ढोल–ताशांच्या गजरात लाडक्या गणरायाला निरोप





### संगम चौकातून पारंपरिक मिरवणुकीला सुरुवात; पावसावर मात करून बाप्पासाठी अविरत भक्तीचा झंकार



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा शहरात आज सकाळपासूनच सुरू असलेल्या संततधारेने वातावरण गारठले असले तरी गणेशभक्तांच्या उत्साहावर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. शहरातील संगम चौक येथून पारंपरिक गणेश विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली असून, ढोल–ताशांच्या गजरात, जल्लोषात आणि भक्तिभावात भर पावसातच बाप्पाला निरोप दिला जात आहे.

मिरवणुकीमध्ये ढोल ताशा पथकांचे वादन, पारंपरिक लेझीम पथकांचे सादरीकरण, तसेच विविध गणेश मंडळांनी साकारलेले सामाजिक संदेश देणारे देखावे हे विशेष आकर्षण ठरत आहेत.

पावसामुळे रस्ते ओले असूनही गणेशभक्त, महिला, तरुण मंडळ कार्यकर्ते, लहान मुले मोठ्या उत्साहाने सहभागी झाले आहेत. ''पाऊस बाप्पाचाच आशीर्वाद आहे,'' अशा भावना व्यक्त करत अनेकांनी पावसात न भिजता, तर नाचत–गात भिजतच मिरवणुकीचा आनंद लुटला.

सुरक्षा व वाहतूक व्यवस्थेसाठी पोलीस प्रशासन, नगरपरिषद कर्मचारी आणि स्वयंसेवक सज्ज असून, शहरात शिस्तबद्ध मिरवणूक पार पडत आहे.

प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी मातीच्या मूर्तींचे प्रमाण वाढले असल्याचेही यंदा निरीक्षणात आले.

गणेश मंडळांनी पर्यावरणपूरक विसर्जनाचा संदेश देतानाच, सांस्कृतिक वारसा जपण्याचा संकल्प यंदाच्या मिरवणुकीतून दिसून येतो आहे.

---

गणेशभक्तांचा संदेश:

''पावसात भिजूनही आमचा उत्साह कमी झालेला नाही. ढोल–ताशांच्या निनादात बाप्पाला निरोप देताना आम्ही पुन्हा 'पुढच्या वर्षी लवकर या' असं सांगतोय.''

# आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपा कार्यकर्त्यांची बैठक



**रिसोड/प्रतिनिधी:** जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने निष्ठावान भाजप कार्यकर्त्यांची सभा ज्येष्ठ भाजपाने नेते नारायणराव सानप यांचे अध्यक्षतेखाली भाजप कार्यालयात दिनांक ४ सप्टेंबर रोजी संपन्न झाली.या सभेला कार्यकर्त्यांनी भाजप नेते माजी आमदार अँड विजयराव जाधव यांना निमंत्रित केले होते.प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ मुरलीधर टकले, सोमनाथ खके, डी के सदार, नामदेवराव हुंबाड उपस्थित होते.

जिल्हा परिषद,पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकीसंदर्भात तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांनी आपल्या भावना माजी आमदार अँड विजयराव जाधव यांच्यासमोर व्यक्त केल्या.रिसोड पंचायत समितीवर तीन वेळा भाजपाचा झेंडा या ठिकाणी उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांमुळेच फडकला. आताचे तर विरोधातच होते. त्यामुळे जुना निष्ठावान कार्यकर्त्यांना जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीमध्ये योग्य व्यक्तीला उमेदवारी मिळायला पाहिजे. माजी आमदार अँड विजयराव जाधव यांनी सर्व कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेतल्या आपण सर्व कार्यकर्ते विचलित होऊ नका.

आपल्या भावना जिल्हा अध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, संघटन मंत्री डॉ उपेंद्र कोठेकर,प्रदेश आमदार रवींद्र चव्हाण यांचे पर्यंत पोहोचवितो. आपण जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका च्या निवडणुकीची तयारी करा.भारतीय जनता पार्टीचे काम करा. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या कामाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवा. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती जनतेला द्या. जनतेची कामे करुण जनतेशी संपर्क ठेवा. प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण संघटन मंत्री डॉ उपेंद्र कोठेकर हे आपल्या सर्वांना न्याय देतील.असे मनोगत माजी आमदार विजयराव जाधव यांनी व्यक्त केले.

सभेचे अध्यक्ष नारायणराव सानप म्हणाले की समोर बसलेल्या कार्यकर्त्यांनी गेल्या वीस पंचवीस वर्षापासून काम करून भाजपाला जनाधार मिळवून दिला. विविध आंदोलने करून कार्यकर्त्यांवर केसेस लागल्या तरीसुद्धा कार्यकर्त्यांनी भाजपाची साथ सोडली नाही. त्यांच्यावर अन्याय होता कामा नये. सभेचे प्रास्ताविक जयंत वसमतकर यांनी,

संचलन विष्णू जाधव यांनी,तर आभार प्रदर्शन गजानन बोडखे यांनी केले. सभेला बबनराव सुरुशे,ज्ञानेश्वर जडवे,अरुण बोडखे, दिगंबर जाधव,रामदास सरकटे,दामोदर गरड,गजानन तिफने, मुरलीधर हाडे,गजानन वाघ, शाम महाराज खराटे, माधव खराटे,रामू सरकटे,नाथा पाटील बोडखे, गजानन साबळे,श्याम रासकर, संतोष गायकवाड,ओम पवार,दीपक बाजड, गजानन मोरे, तानाजी डहाळके, अभिमन्यू कुलाळ, दिगंबर पऱ्हाड बबनराव पाचरणे, बबनराव सानप इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार अटकेत; पोलिसांची तत्पर कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**शिरपूर/प्रतिनिधी:** शहरातील दोन ठिकाणी झालेल्या घरफोडी प्रकरणाचा अवघ्या काही दिवसांत छडा लावत शिरपूर पोलिसांनी सराईत गुन्हेगाराला अटक केली आहे. आरोपीकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेले साहित्य व चोरीस गेलेली मोठी रोकड जप्त करण्यात आली आहे. ही कामगिरी पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने पार पाडली.

**गुन्ह्याची पार्श्वभूमी**

दिनांक ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२५ दरम्यान, शिरपूर शहरातील 'डायमंड बिअर शॉप' आणि 'दिप मल्टीस्पेशालिटी दातांचे हॉस्पीटल' या दोन व्यावसायिक ठिकाणांची लोखंडी शटरची कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी एकूण ६९,०००/– रुपये रोख रक्कम चोरून नेली होती. याबाबत फिर्यादी दिनेश अशोक चौधरी आणि डॉ. संघरत्न छगन निकुंभे यांनी शिरपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.




**तपासाची दिशा आणि आरोपीची अटक**

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीसांनी तत्काळ तपासाला सुरुवात केली. गुन्हे शोध पथकाने संशयास्पद हालचालींच्या आधारे निमझरी नाका, शिरपूर येथे एक युवकाला ताब्यात घेतले. चौकशीत त्याची ओळख अरविंद प्रकाश बारेला (बर्डे) वय २०, रा. बंधारा खुर्द, ता. पानसेमल, जि. बडवाणी (म.प्र.) अशी पटली. पोलिसांनी घेतलेल्या कसून चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

**गुन्ह्यात वापरलेले साहित्य आणि जप्ती**

आरोपीकडून खालील साहित्य आणि रोकड जप्त करण्यात आली:

चोरीस वापरलेले २ स्क्रू ड्रायव्हर, १ लोखंडी सळई, १ पोपट पाना, १ कटावणी, १ करवतीचा तुकडा

चोरीस गेलेली ६३,०००/– रूपये रोख रक्कम (त्यापैकी काही रक्कम त्याने पाटाजवळील शेतात लपवून ठेवली होती, अशी कबुली दिली)

**पूर्वीचे गुन्हेगारी रेकॉर्ड**

अरविंद बारेला (बर्डे) याच्यावर यापूर्वीही शिरपूर व पानसेमल पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल असून, तो सराईत गुन्हेगार असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

**पोलीस दलाची प्रशंसनीय कामगिरी**

सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सुनिल गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी आणि त्यांच्या डी.बी. पथकाने केली. या कामगिरीबद्दल शिरपूर पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी म्हणाले: ''शिरपूर शहरात कायदा व सुव्यवस्थेचा भंग करणाऱ्या गुन्हेगारांवर आम्ही कठोर कारवाई करत आहोत. शहरातील नागरिकांनी पोलिसांवर विश्वास ठेवावा व कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तातडीने माहिती द्यावी.''

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले.
मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या संकल्पनेतून साजरा झाला सामाजिक भान जपणारा गणेशोत्सव

## गणपती बाप्पांना साश्रूनयनांनी भावपूर्ण निरोप संघर्षशील व्यक्तींचा दररोज सन्मान

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी:** क्रांतिकारी गणेशोत्सव मंडळाचा विसर्जन सोहळा आज उत्साहात पार पडला. गणरायाच्या आरत्या, डफडे व डि जे चा गजर आणि भावनिक वातावरणात गणपती बाप्पांना साश्रूनयनांनी निरोप देण्यात आला.

मंडळाचे अध्यक्ष शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी यंदा सामाजिक भान जपत आगळावेगळा उत्सव साजरा केला. सौ. शर्वरीताई तुपकर यांच्या संकल्पनेतून उभारलेला शेतकरी आंदोलनाचा देखावा समाजमाध्यमांवर विशेष गाजला.

दररोजच्या आरतीचा मान समाजातील वंचित व संघर्षशील व्यक्तींना देण्यात आला. यात दत्तक कन्या, शहीद जवानांच्या पत्नी, एमबीबीएससाठी मुलाला शिकवणारा पंक्चर कामगार, सलून व्यवसायातून पत्नीला शिक्षण देऊन नोकरीत रुजू करणारा व्यक्ती, दुध उत्पादक शेतकरी, रिक्षा चालवणारी महिला, विशेष सेवा पदकप्राप्त पोलिस कॉन्स्टेबल, नर्सेस तसेच सेवानिवृत्त सैनिकांचा समावेश होता. प्रत्येक आरतीतून संघर्ष, कर्तृत्व आणि प्रेरणा यांचा गौरव झाला.

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची परंपरा सुरू करताना सामाजिक बांधिलकी, लोकजागृती आणि एकोप्याचा संदेश देण्याचा विचार मांडला होता. यंदाच्या क्रांतिकारी गणेशोत्सव मंडळाच्या उपक्रमातून हाच संदेश प्रत्यक्षात साकार झाल्याची भावना जनमानसात उमटली आहे, अशी चर्चा परिसरात रंगली आहे.

यावेळी तरूणांनी विशेष गर्दी केली होती. परिसरातील नागरिक व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. डफड्यांच्या तालावर रविकांत तुपकर यांच्या परीवारातील सर्वांनी. चौकट डान्स केला . यावेळी महीला भगीनी पण थिरकल्या रविकांत तुपकर व सौ शर्वरीताई तुपकर यांनी फुगडी खेळत आनंद द्विगुणित केला. विसर्जना वेळी गणपती बाप्पां चं ट्रैक्टर चालवत रविकांत तुपकर यांनी स्वतः सारथ्य केले गणपती विसर्जनाच्या वेळी वाजत-गाजत, डफडे व डि जे च्या गजरात भावपूर्ण वातावरणात बाप्पांना निरोप देण्यात आला. पैनगंगा नदी मध्ये बाप्पांचं विसर्जन केले गेले. उत्साह आणि ओढीबरोबरच डोळ्यांत पाणी आणणारा हा निरोपाचा क्षण सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला. गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या या घोषणांनी आसमंत दणाणून गेला.

यावेळी रविकांत तुपकर यांनी गणपती बाप्पां ना प्रार्थना केली की शेतकऱ्यांना कर्जमुक्ती ची सद्बुद्धी सरकारला होऊ दे शेतकरी सुखी समृद्ध व प्रगत होऊ दे . शेतमालाला योग्य भाव मिळुन शेतकऱ्यांच्या कष्टाचं चीज होऊदे हा गणेशोत्सव केवळ धार्मिक विधींच्या चौकटीत न राहता समाजातील वंचित व प्रेरणादायी घटकांना गौरवणारा, समाजजीवनाला नवीन दिशा दाखवणारा आणि संघर्षातून प्रेरणा देणारा ठरल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

## महत्त्वाचे...

### सोलापूरमध्ये डॉल्बीमुक्त विसर्जन मिरवणुकीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सहभाग

पारंपरिक वाद्यांच्या निनादात साजरा झाला गणेशोत्सवाचा निरोप; मंडळांच्या शिस्तबद्ध सहभागाचे कौतुक



दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर /प्रतिनिधी:** सोलापूरमध्ये यंदाचा गणेशोत्सव डॉल्बीमुक्त व पारंपरिक वाद्यांच्या गजरात मोठ्या उत्साहात पार पडला. सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्वतः मिरवणुकीत सहभाग घेत, विविध गणेश मंडळांना भेटी दिल्या आणि शिस्तबद्ध, पर्यावरणस्नेही गणेशोत्सवासाठी मंडळांचे विशेष कौतुक केले.

पालकमंत्र्यांनी प्रसिद्ध लाल आखाडा गणेश मंडळाच्या बाप्पाची पूजा करून मिरवणुकीचा शुभारंभ केला. त्यानंतर ते शहरातील विविध गणेश मंडळांना भेटी देत, गणेशभक्तांशी संवाद साधत सांस्कृतिक व भक्तिपूर्ण वातावरणाचा अनुभव घेत होते.

यंदाचा उत्सव विशेष ठरला, कारण शहरात प्रथमच डॉल्बीमुक्त विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. यावर प्रतिक्रिया देताना पालकमंत्री गोरे म्हणाले,

''सोलापूरमध्ये डॉल्बीमुक्त आणि पारंपरिक वाद्यांच्या तालात निघालेली मिरवणूक पाहून मन आनंदित झाले. मंडळांनी प्रशासनाच्या आवाहनाला साथ देत उत्तम शिस्त व सहकार्य दाखवले आहे. हे खरंच कौतुकास्पद आहे.''

मिरवणुकीत लेझीम, ढोल, ताशा, झांजपथक यांचे प्रभावी सादरीकरण झाले. गणेश मंडळांचे सजावट, सामाजिक संदेश देणारे देखावे आणि अनुशासित मिरवणूक यामुळे संपूर्ण शहरात एक वेगळाच उत्सवमय उत्साह पाहायला मिळाला. पालकमंत्र्यांनी मिरवणूक संपल्यानंतर सोलापूर शहरातील सर्व गणेश मंडळांचे आभार मानले आणि यापुढेही असेच सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध व पर्यावरणपूरक सण साजरे करण्याचे आवाहन केले.

जयकुमार गोरे, पालकमंत्री, सोलापूर

''सोलापुरात आल्याचा मला खूप आनंद झाला. गणेश मंडळांनी डॉल्बीऐवजी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य दिले. हे बदलाचे स्वागतार्ह पाऊल आहे.''

### खामगावमध्ये अनंत चतुर्दशी विसर्जन मिरवणुकीला भव्य प्रारंभ; सुरक्षा व्यवस्था कडेकोट



**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे आज अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपती विसर्जन मिरवणुकीला जल्लोषात आणि भक्तिभावाने भव्य प्रारंभ झाला. यंदाही अग्रस्थानी असलेल्या मानाचा लाकडी गणपतीची आरती जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे आणि माजी आमदार दिलीप कुमार सानंदा यांच्या हस्ते पार पडली. त्यानंतर सकाळी ९ वाजता मिरवणुकीचा औपचारिक शुभारंभ झाला.



गेल्या दहा दिवसांपासून साजरा करण्यात आलेला गणेशोत्सव आज देशभरात अनंत चतुर्दशीच्या दिवशी संपन्न होत आहे. खामगावमध्ये विसर्जन मिरवणुकीसाठी उत्साही गर्दी उसळली असून, शिस्तबद्ध आणि रंगतदार वातावरण पाहायला मिळत आहे.

यंदा मिरवणुकीसाठी एकूण २९ गणेश मंडळांनी सहभाग घेतला असून लकी ड्रॉद्वारे त्यांचा विसर्जन क्रम निश्चित करण्यात आला. मिरवणुकीत तानाजी गणेश मंडळ, हनुमान गणेश मंडळ आणि राणा गणेश मंडळ आदींचा समावेश होता.

सुरक्षा व्यवस्था कडेकोट ठेवण्यात आली आहे. संपूर्ण मिरवणुकीवर सीसीटीव्ही, ड्रोन कॅमेरे आणि नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून सतत नजर ठेवण्यात येत आहे. सार्वजनिक सुव्यवस्थेच्या दृष्टीने निर्मल टर्निंग ते राणा गेट आणि शिवाजी वेस ते बोरीपुरा या मार्गांवर संचारबंदी लागू करण्यात आली होती. खामगावकरांच्या श्रद्धा, उत्साह आणि शिस्तबद्ध सहभागामुळे विसर्जन मिरवणूक अत्यंत मंगलमय आणि भावनिक वातावरणात पार पडत आहे.

### ठाण्यात गणेशभक्तांसाठी चहा, नाष्टा, जेवण, पाण्याची मोफत सोय; पालिका निवडणुका लक्षात घेऊन सर्वच राजकीय पक्ष सरसावले

**ठाणे /प्रतिनिधी:** आज अनंत चतुर्दशी ( २०२५) आहे. सकाळपासून गणेशभक्त गणेश विसर्जनासाठी ( २०२५) रस्त्यावर आले आहेत. या सर्वच गणेश भक्तांना मदत करण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी विसर्जन केंद्रावर मोफत नाष्टा, सरबत, चहा जेवणाची सोय केली आहे. याचा उपयोग देखील गणेशभक्तांना होत असून अशा राजकीय पक्षांच्या स्टॉलची रीघ लागलेली ठाण्यात पाहायला मिळत आहे. आगामी महानगरपालिका निवडणुका जाहीर होत आहेत, अशावेळी सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचण्यासाठी गणेशोत्सवानिमित्त सर्वच राजकीय पक्ष पुढे सरसावले आहेत.

ठाणे शहरात गणपती बाप्पांचे विसर्जन भावपूर्ण वातावरणात पार पडले. रोज मोठ्या उत्साहाने गणरायाची पूजा अर्चा करणारे चेहरे आज बाप्पांच्या जाण्याने हिरमुसले होते. तर ठाण्यात राजकीय पक्षांनी भक्तांसाठी मोफत वाहन सुविधा, जेवण आणि नाश्त्याची सोय केली होती. एकीकडं जेवण आणि विविध सुविधा पुरवल्या जात आहेत. त्यामुळं हे काम करणाऱ्या कामगारांना या निमित्ताने उत्पन्नाचे साधन देखील उपलब्ध झाले आहे. अनेक महिला आणि व्यावसायिकांना या राजकीय सुविधा दिल्यानं फायदा होताना दिसत आहे. विविध राजकीय पक्षाचे कार्यकर्ते गणेशोत्सवानिमित्त रस्त्यावर आले असून त्यांनी प्रशासनाला मदत करत आहेत. त्यांना देखील जेवण, नाष्टा जागेवर दिला जात असून ठाण्यातील खाडी तलाव आणि विसर्जन परिसरात हजारो लोकांना ही सुविधा मिळत आहे. या स्वयंसेवक नागरिकांसोबत वाद्य वाजवणारे वाहन चालक या सर्व नागरिकांना देखील या मोफत सुविधेचा फायदा होत आहे.

### भर पावसात प्रिया वॉरियरचा तुफान डान्स, मनमोहक अदांनी नेटकऱ्यांची मने जिंकली

**मुंबई/प्रतिनिधी:** पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. ' ' या गाण्यावर तिने तुफान डान्स केलाय. यावेळी तिने क्रीम कलरची साडी नेसली असून तिचा डान्स व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झालाय. प्रियाने आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर हा व्हिडीओ पोस्ट केला असून काही तासांतच लाखो लोकांनी तो पाहिला आहे. तिच्या या डान्सला नेटकऱ्यांकडून जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. चाहत्यांनी तिच्या अदा, तिच्या स्माईल आणि लूकवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. कमेंट बॉक्समध्ये फॅन्सनी ''क्वीन ऑफ एक्स्प्रेशन्स'', '' गॉर्जियस लूक'' अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत. प्रिया वॉरियरने २०१८ साली 'ओरु अडार लव्ह' या मल्याळम चित्रपटातून पदार्पण केले होते. या चित्रपटातील एका गोड 'विंक सीन'मुळे ती रातोरात स्टार झाली. तिचा तो छोटासा क्लिप व्हिडीओ सोशल मीडियावर इतका व्हायरल झाला की ती 'विंक गर्ल' म्हणून प्रसिद्ध झाली. त्या एकाच सीनमुळे प्रिया वॉरियरला संपूर्ण देशभरात लोकप्रियता मिळाली. तिच्या या लोकप्रियतेचा फायदा तिला बॉलिवूडमध्येही मिळाला आणि तिने श्रीदेवी बंगलो व लव्ह हॅकर्स सारख्या हिंदी चित्रपटांमध्ये काम केले. चित्रपटांसोबतच प्रिया सोशल मीडियावर देखील सक्रिय असते.

## बेलगावमध्ये शिक्षक दिनी स्वयंशासन दिन साजरा; विद्यार्थ्यांनी सांभाळले शालेय प्रशासन

विद्यार्थ्यांनी साकारले शिक्षकांचे रूप; बेलगावमध्ये उत्साहात स्वयंशासन दिन

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव



**बेलगाव :** महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालय, बेलगाव येथे शिक्षक दिनाचे औचित्य साधून ५ सप्टेंबर रोजी 'स्वयंशासन दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यार्थ्यांनी शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या भूमिका साकारत एक दिवसासाठी शाळेचे संपूर्ण प्रशासन सांभाळले.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक दीपक कुटे सर यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यांनी विद्यार्थ्यांना डॉ. राधाकृष्णन यांचे शिक्षण, कार्य व राष्ट्रपती पदापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास सविस्तरपणे उलगडून सांगितला. तसेच शालेय उपक्रमांमध्ये सक्रीय सहभागामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास कशी चालना मिळते, यावरही त्यांनी मार्गदर्शन केले.

या वेळी इयत्ता दहावीचा कार्तिक ओम वानखेडे याने एक दिवसासाठी मुख्याध्यापकाची भूमिका यशस्वीरित्या पार पाडली. तर इतर विद्यार्थ्यांनी विविध विषयांचे शिक्षक म्हणून जबाबदाऱ्या निभावल्या. मरियम शे. हबीब, अंकिता इंगळे, वैष्णवी जाधव, शेख फिजा, शे. रऊफ, रिजवान राजिक शेख, रूपाली जाधव, वैभव कांबळे, अभिषेक वानखेडे, अश्विनी खडसे, शेख सोईफ आणि उषा भुरकाडे या विद्यार्थ्यांनी आपले कार्य चोख बजावले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक कावरखे सर, वानखेडे सर, गीते सर, सचिन रहाटे सर, जायभाय सर, साखरे सर, खुशालराव मेटांगळे सर, विजय दाभाडे सर आणि गजानन देशमुख सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रम अधिक संस्मरणीय केला.

# अकोला जिल्ह्यातील हिंगणा गावात सामूहिक श्रीगणेश विसर्जनाचा पर्यावरणपूरक उपक्रम

## एकाच कुंडीत संपूर्ण गावकऱ्यांकडून विसर्जन; 'मातीच्या गणपतीपासून रोपट्यापर्यंत' भावनिक प्रवास

दैनिक आपला विदर्भ





**अकोला/प्रतिनिधी:** अकोला जिल्ह्यातील पातूर तालुक्यातल्या हिंगणा गावात या वर्षी गणेश विसर्जनाला एक अनोखा, भावनिक आणि पर्यावरणपूरक वळण लाभले. गावकऱ्यांनी संपूर्ण गावातील मातीच्या गणपतींचे विसर्जन एका ठराविक कुंडीत एकत्रितपणे केले आणि 'बाप्पा पुढच्या वर्षी लवकर या' असा निरोप देतानाच एक सुंदर सामाजिक संदेशही दिला.

या उपक्रमात विशेषत्वाने लक्ष वेधून घेतले ते म्हणजे मातीच्या मूर्तींचे विसर्जन एका स्थायी कुंडीत करण्याचा निर्णय. यामागील उद्देश सांगताना गावकरी म्हणाले, ''मातीच्या गणपतींचे विसर्जन नद्यांमध्ये किंवा ओढ्यांमध्ये न करता एका कुंडीत करून आम्ही माती आणि पाण्याचे संवर्धन करत आहोत. विसर्जनानंतर याच कुंडात उगवणारे रोप हेच बाप्पाचे नवीन रूप असणार आहे.''

गावातील सर्व गणेश मंडळ, घरगुती गणपती स्थापनेनंतर विसर्जनासाठी त्या कुंडात एकत्र आले. विसर्जनाच्या वेळी वाजंत्री, भजन आणि हरिपाठ यांचा संगम होता. विसर्जनाच्या या सामूहिक कार्यक्रमात महिलांचाही मोठा सहभाग होता. काही महिलांनी पारंपरिक पोशाखात 'ओटी' भरण्याचा विधीही केला.

या कुंडाची खास वैशिष्ट्ये:

कुंडाची रचना नैसर्गिक जलस्रोताच्या रचनेप्रमाणे करण्यात आली होती.विसर्जनानंतर त्यात जैवखत मिसळून वृक्षलागवड करण्यात येणार आहे.

पुढील वर्षीपर्यंत बाप्पाचे अस्तित्व रोपट्याच्या रूपात जपले जाणार आहे.

गावकरी दररोज कुंडात पाणी टाकून, उगवणाऱ्या रोपट्यांची निगा राखणार आहेत. हा उपक्रम म्हणजे पर्यावरण रक्षणासोबतच धार्मिक श्रद्धेला नव्या पिढीला जोडणारा एक आदर्श दुवा आहे, असे अनेक ग्रामस्थांनी सांगितले.

हिंगणा गावचा हा उपक्रम 'मातीपासून मूर्ती आणि मूर्तीपासून पुन्हा माती' या नैसर्गिक चक्राला प्रोत्साहन देणारा ठरला आहे. या माध्यमातून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना पर्याय म्हणून मातीच्या मूर्तींचा वापर वाढावा, याचाही सकारात्मक संदेश दिला गेला. हा उपक्रम भविष्यात इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# अनंत चतुर्दशीच्या विसर्जन मिरवणुकीत वंदे मातरम मंडळाचा ‘लंका दहन’ देखावा विशेष आकर्षण








**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** आज शहरात अनंत चतुर्दशी निमित्त पारंपरिक गणेश विसर्जन मिरवणुकीला उत्साहात प्रारंभ झाला. शहरातील विविध मंडळांकडून सामाजिक, ऐतिहासिक आणि देशभक्तीपर विषयांवर आधारित देखाव्यांची सादरीकरणे करण्यात आली. या मिरवणुकीत वंदे मातरम मंडळकडून दरवर्षीप्रमाणे यंदाही ‘‘हनुमानाने लंका दहन केले‘‘ या पौराणिक प्रसंगावर आधारित देखावा सादर करण्यात आला. हा देखावा प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेत होता.

मिरवणुकीत पंजाब येथून आलेल्या खालसा ग्रुपच्या प्रात्यक्षिकांनीही उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या शिस्तबद्ध आणि जोशपूर्ण सादरीकरणाने वातावरण देशभक्तीने भारून गेले. अकोला येथील शिवशाही ग्रुपकडून देखील आकर्षक देखावा आणि पारंपरिक लेझीम नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. विशेष म्हणजे, सध्या देशभरात सुरु असलेल्या ऑपरेशन सिंदूर या लष्करी मोहिमेचा देखावा देखील यावेळी मिरवणुकीत सादर करण्यात आला, ज्याने देशाच्या सुरक्षेसाठी कार्यरत जवानांना सलामी दिली गेली.

वंदे मातरम मंडळाचे पदाधिकारी रमेश भट्टड म्हणाले, ‘‘गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सण नसून सामाजिक संदेश देण्याचे प्रभावी माध्यम आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही आम्ही ऐतिहासिक आणि प्रेरणादायी देखावा सादर करून लोकांमध्ये देशभक्तीची भावना जागवण्याचा प्रयत्न केला आहे.‘‘

शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभाग घेतला. पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त करण्यात आला असून, मिरवणूक रात्री उशिरापर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे.

## विविध वृत्त...

### दोंडाईचा रावल गढीच्या श्रीमंत राजा गणपतीचे विसर्जन; मंत्री जयकुमार रावल यांनी मिरवणुकीत धरला ठेका




**धुळे/प्रतिनिधी:** धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा येथील रावल गढी वरील श्रीमंत राजा गणपतीचे आज पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या उपस्थितीत विसर्जन करण्यात आले. यावेळी मंत्री रावल यांनी विसर्जन मिरवणूक मध्ये ठेका धरून गणेश भक्तासोबत मनसोक्त आनंद घेतला. यावेळी दोंडाईचा पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. मिरवणूक रावल गढी पासून महाराणा प्रताप स्मारक, आझाद चौक एकता चौक, जामा मशिद, अहिल्याबाई होळकर चौक, मार्गे महाराणा प्रताप स्मारक शिवाजी महाराज पुतळा जवळ आरती तापी नदीत बाप्पाचे विसर्जन करण्यात आले मिरवणुक मध्ये कर्नाटक मधील धोल पथकाने सर्वाचे लक्ष वेधले, तसेच राजेशाही परंपरा नुसार मिरवणूक काढण्यात आली.

### मुंबई-ठाण्यात देवाभाऊचे बॅनर झळकले, मराठा आरक्षणावर भाजपचे कॅम्पेन; एकनाथ शिंदे म्हणाले, आम्ही श्रेयवादाच्या लढाईत नाही

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणासंबंधी तीन महत्त्वाचे जीआर काढल्यानंतर भाजपने आता देवेंद्र फडणवीसांचे कँपेन सुरू केल्याचं दिसून येतंय. मुंबई आणि ठाण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे देवाभाऊ असा उल्लेख असलेले बॅनर लावण्यात आले आहेत. त्याचसोबत वृत्तपत्रांमध्येही तशा जाहिराती प्रकाशित करण्यात आल्या आहेत. त्यावर एकनाथ शिंदेंनी मात्र सूचक प्रतिक्रिया दिली. आम्ही श्रेयवादाच्या लढाईत नाही असं शिंदे म्हणाले.

मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांच्या प्रमुख मागण्या मान्य करत राज्य शासनाने तीन महत्त्वाचे जीआर काढले आहेत. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा उपसमितीच्या माध्यमातून हा निर्णय घेण्यात आला. यावर मनोज जरांगे यांनीही समाधान व्यक्त करत सरकारचे आभार मानले.

मराठी आरक्षणासंबंधी तीन महत्त्वाचे जीआर काढल्यानंतर त्याचे श्रेय घेण्यासाठी भाजपकडून प्रयत्न सुरू असल्याचं दिसून येतंय. त्याचाच एक भाग म्हणून मुंबई आणि ठाण्यात देवाभाऊ असा उल्लेख असलेले बॅनर लावण्यात आले आहेत.यामध्ये देवेंद्र फडणवीस हे छत्रपती शिवाजी महाराजांना नमन करताना फोटो दिसतो. या बॅनरवर फक्त देवाभाऊ एवढाच उल्लेख करण्यात आला आहे. तर राज्यातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावरही देवाभाऊ असा उल्लेख असलेल्या जाहिराती प्रकाशित करण्यात आल्याचं दिसत आहे.

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते वृत्तेश्वर गणरायाची भव्य आरती



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्ह्यातील पत्रकार भवन परिसरात यंदा प्रथमच स्थापन करण्यात आलेल्या वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळाने समाजापुढे एक नवीन उपक्रम राबवण्याची सुरुवात केली आहे.

या मंडळातर्फे आयोजित करण्यात आलेल्या मानाच्या आरतीचा मान केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांना देण्यात आला. त्यांनी मोठ्या भक्तिभावाने गणरायाची आरती करत उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळाचे हे पहिलं वर्ष असलं, तरी मंडळाने धार्मिकतेसोबतच सामाजिक भान राखणारे कार्यक्रम आयोजित केले, हे विशेष. गणेशोत्सवाच्या निमित्ताने आरोग्य तपासणी, रक्तदान शिबीर, महिला सक्षमीकरण आणि पर्यावरणपूरक उपक्रम या माध्यमातून समाजप्रबोधनाचा संदेश दिला जात आहे.

आरतीच्या कार्यक्रमाला राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती, तर स्थानिक नागरिकांनीही मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. गणेशोत्सव हा केवळ श्रद्धेचा नव्हे, तर समाज बांधणीचा एक माध्यम ठरू शकतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळ.

## भाजपच्या व्यासपीठासमोरच ठाकरेंच्या माजी आमदारानं लावलं शिवसेनेचं गाणं, भाजपला डिवचलं, समर्थकांनी धरला ठेका

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी:** राज्यभरात मोठ्या उत्साहत गणेश विसर्जन मिरवणुका सुरु आहेत. ठिकठिकाणी ढोल ताशांच्या गजरात बाप्पाला निरोप देण्यात येत आहे. नाशिकमध्येही मोठ्या उत्साहत गणेश विसर्जनाच्या मिरवणुका सुरु आहेत. दरम्यान, नाशिकमध्ये ठाकरेंच्या माजी आमदाराने भाजपच्या व्यासपीठासमोरच शिवसेनेचं गाणं लावल्याचं पाहायला मिळालं. शिवसेना शिवसेना गाणं लावून भाजपला डिवचल्याचं पाहायला मिळालं.

भाजप पदाधिकाऱ्यांसमोर शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार वसंत गीते आणि ठाकरे गटाचे महानगरप्रमुख प्रथमेश गीते यांच्या समर्थकांनी ठेका धरला आहे. विविध गाण्यांच्या माध्यमातून गीतेंच्या समर्थकांनी भाजपला त्यांच्याच व्यासपीठासमोरुन डिवचल्याचं पाहायला मिळालं. भाजप पदाधिकारी देखील सगळे उभे राहून आव्हान देत होते.

नाशिकच्या मालेगावमध्ये गणेश विसर्जनला गालबोट, तणावाचे वातावरण

गेल्या दहा दिवसांपासून भक्ती, श्रद्धा आणि उत्साहात साजरा झालेल्या गणेशोत्सवाचा (२०२५) समारोप आज (शनिवार, ६ सप्टेंबर) होत आहे. पारंपरिक वाद्यांच्या गजरात, ढोल-ताशांच्या ठेक्यावर आणि गुलालाच्या उधळणीत गणपती बाप्पाला निरोप देण्यासाठी मोठ्या संख्येनं लोक बाहेर पडले आहेत. नाशिक जिल्ह्यातही मोठ्या उत्साहात गणेश विसर्जन सुरु आहे. दरम्यान, नाशिकच्या मालेगावमध्ये गणेश विसर्जनला गालबोट लागलं आहे. फाडलेल्या वर्गणी पावतीचे पैसे मागण्यासाठी गेलेल्या मंडळाच्या सदस्याला मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे.

## सन्मान आणि संस्कृतीचं दर्शन डोणगावमध्ये गणेश मंडळांचा विसर्जन मिरवणुकीत गौरव





**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/ कार्यालय प्रतिनिधी:** गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. प्रत्येक गणेश मंडळ आपल्या भक्तिभावाने, शिस्तबद्धतेने आणि समाजाभिमुख उपक्रमांद्वारे आपल्या मंडळाला वेगळ्या उंचीवर नेत असते. याच भावनेतून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या प्रमुख गणेश मंडळांचा थेट मिरवणुकीत जाऊन शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला.

या वेळी त्यांच्या सोबत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव पंकज पळसकर देखील उपस्थित होते. मंडळाच्या अध्यक्षांचा मानपान करताना, ‘‘गणेश मंडळ समाजामध्ये एकतेचा, भक्तीचा आणि शिस्तीचा संदेश देतात. आज विसर्जनाच्या दिवशी त्यांचा सन्मान करणे हे आमचे सामाजिक कर्तव्यच आहे,’’ असे गोपाला खाडे यांनी सांगितले.

गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत सहभागी होत त्यांनी थेट मंडळाच्या पदाधिकाऱ्यांपर्यंत जाऊन त्यांना सन्मानित केले. यावेळी उपस्थित नागरिकांनी आणि गणेशभक्तांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

समाजासाठी काहीतरी सकारात्मक देण्याची जबाबदारी प्रत्येक समाजभान असलेल्या व्यक्तीची असते, हे आखाडे यांच्या या उपक्रमातून पुन्हा अधोरेखित झाले आहे. यावेळी महाराष्ट्र प्रदेश सचिव पंकज पळसकर.जिल्हाप्रमुख गोपाल सुभाषराव आखाडे. डोणगाव शहर प्रमुख विजय सरकटे,गणेश आढाव, पवन आखाडे,तसेच इतर कार्यकर्ते उपस्थित होते

## मराठीचा जयजयकार! डोणगावमध्ये गणेशोत्सवात ‘मराठी अभिजातते’चा भव्य देखावा

**दैनिक आपला विदर्भ**




**डोणगाव/प्रतिनिधी:** डोणगाव येथे मदन वामन पातुरकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर एक वेगळीच उत्सवाची छटा पाहायला मिळाली. ‘‘मराठी भाषेचा विजय असो!‘‘ अशा उत्साही घोषणा, पारंपरिक वेशभूषा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी सजलेली ही मिरवणूक संपूर्ण गावाचे लक्ष वेधून घेणारी ठरली.

यंदाच्या मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले ‘‘मराठी भाषेचा अभिजात दर्जा’’ या विषयावर आधारित देखावा. केंद्र सरकारने मराठी भाषेला दिलेला अभिजात भाषेचा दर्जा यंदाच्या गणेशोत्सवात विशेष ठळकपणे साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी फलक, नृत्य आणि वेशभूषेच्या माध्यमातून मराठी भाषा, संस्कृती आणि वारशाचे महत्त्व प्रभावीपणे सादर केले.

मुख्य वैशिष्ट्ये:

बारावीच्या विद्यार्थ्यांनी या देखाव्याची संकल्पना साकारली. विद्यालयाचे शिक्षक सुर्व्हे सर यांच्या मार्गदर्शनाखाली या देखाव्याचे प्रभावी सादरीकरण झाले.

‘‘मराठी भाषेचा गौरव वाढवणे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे कर्तव्य आहे,‘‘ असे संदेश देणारे फलक उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते.

विविध सांस्कृतिक झांक्यांमधून पर्यावरणसंवर्धन, महिला सक्षमीकरण, भारतीय परंपरा आणि भाषेचे जतन यासारखे सामाजिक संदेशही दिले गेले.

विद्यालयाच्या शिक्षिका म्हणाल्या की, ‘‘मराठी भाषेला मिळालेला अभिजात दर्जा हा केवळ सन्मान नाही, तर जबाबदारीदेखील आहे. आम्हाला अभिमान आहे की आमच्या विद्यार्थ्यांनी हा विषय गणेशोत्सवात प्रभावीपणे सादर केला.‘‘

या मिरवणुकीत विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गावभर मराठी भाषेचा गजर, पारंपरिक ढोल-ताशा आणि विद्यार्थ्यांचा उर्जास्वित सहभाग यामुळे हा गणेशोत्सव एक आगळा वेगळा सांस्कृतिक सोहळा ठरला.

या उपक्रमातून डोणगावमधील विद्यार्थ्यांनी केवळ गणेशोत्सव साजरा केला नाही, तर मराठी भाषेच्या अभिमानाची आणि जाणीवेची जागृतीही प्रभावीपणे घडवली. अशा उपक्रमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे सामाजिक भान आणि सृजनशीलता अधोरेखित होते. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य सर्व शिक्षिका शिक्षक रुंद उपस्थित दिसून आले.